: प्रकरण पाचवे :

# रा. रं. बोराडे ह्यांचे मराठी कथावाङ्मयातील स्थान

# प्रकरण पाचवे :

# रा. रं. बोराडे ह्यांचे मराठी कथावाङ्मयातील स्थान

## ५.१. *प्रास्ताविक :*

मराठी साहित्यात विविध वाङ्मयीन प्रवाह निर्माण झाले आहेत. 'ग्रामीण साहित्य' हा त्यातीलच एक महत्त्वाचा व प्रतिष्ठाप्राप्त वाङ्मयप्रवाह होय. ह्या प्रवाहामध्ये प्रामुख्याने 'कथा' हा वाङ्मयप्रकार विपुलतेने, विविधतेने व समृध्दतेने नटलेला आहे. १९६० नंतरच्या ग्रामीण साहित्याचा कालखंड पाहिला, तर रा. रं. बोराडे, आनंद यादव, सखा कलाल, महादेव मोरे, चारूता सागर, चंद्रकुमार नलगे, भास्कर चंदनशिव अशी प्रमुख कथाकारांची पिढी दिसते. त्यांच्या जन्मकाळातच दुसरे जागतिक महायुध्द पेटले. त्याच्या ज्वाला साऱ्या जगाला लपेटून गेल्या. माणसाचे क्षुद्रपण उघडे पडले. जीवनात जपलेल्या श्रध्दा होरपळून गेल्या. नीतिमूल्यांचा ऱ्हास झाला. त्यातून मानसशास्त्रज्ञांनी व समाजशास्त्रज्ञांनी अगम्य मानवी मनाचा अंतर्द्रोह, अंत:स्फोट व अज्ञान ह्यांचा शोध सुरू केला व मानवाच्या अंतर्नादाचा वेध घेतला जाऊ लागला. ह्या वेळी कथा लहानमोठ्या मोहातून मुक्त होऊन कलात्मक बनू लागली होती.

१९४२ मध्ये स्वातंत्र्याची चळवळ उग्र रूप धारण करून उभी होती. मार्क्सवाद व गांधीवादाची मुळे जगात रूजली होती. गांधीजींनी 'खेड्याकडे चला' असे आवाहन केले होते. त्यातून खेडी खडबडून जागी झाली होती. स्वातंत्र्याचा मानदंड घेऊन समाज उभा राहिला होता व शेवटी १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. इंग्रजाबरोबर रझाकाराच्याही बेड्या तुटल्या. भारत प्रजासत्ताक झाला आणि एका विलक्षण द्वंद्वातून 'ग्रामीण जीवन' मुक्त झाले. ग्रामीण प्रदेश विविध क्षेत्रांमध्ये रंग पालटू पहात होता. ग्रामीण माणूस नव्या जोमाने, नव्या इराद्याने कामाला लागला. स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. जीवनाच्या सर्व स्तरांवर नव्या संकल्पना उभ्या राहिल्या व नव्या युगाच्या प्रवर्तनाला खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला.

संयुक्त महाराष्ट्रनिर्मितीच्या प्रेरणेने मने ढवळून निघाली व इ.स. १९६० ला महाराष्ट्राची निर्मिती झाली. अवघा महाराष्ट्र सजग झाला. ह्याच काळात ग्रामीण साहित्यिकांची ही तिसरी पिढी लिहिती झाली. ग्रामीण भागात होणारे बदल ग्रामीण मनावर अधिराज्य गाजवू लागले. मानवी जीवनाच्या अंतर्बाह्य बदलाचा हा कालखंड होता. सामाजिक,राजकीय, आर्थिक,शैक्षणिक व सांस्कृतिक बदल दिसून येत होते. वैचारिक मतभेद व तत्त्वभेद ह्यांच्या संघर्षठिणग्या उडत होत्या. भीषण दुष्काळामध्ये सामान्यजन हैराण झाले. नातीगोती मोडीत निघाली. ह्या सर्व पार्श्वभूमीवर ग्रामीण साहित्य लिहिणारे

साठोत्तरी साहित्यिक हे लेखन करीत होते. बोराडे हे त्या पैकीच एक असून हे ह्या सर्व काळाचे साक्षीदार, निरीक्षक व चिंतक आहेत. ह्या बदलत्या जीवनाचे सादपडसाद त्यांनी जवळून अनुभवले आहेत. खेडयातील दैन्य, ढोंग, दांभिकता, दुभंगता ह्या वास्तव प्रश्नांची उकल त्यांनी स्वत्त्व शोधातून केली. अस्सल ग्रामीण जीवनाचे वास्तव चित्रण करणारे, बदलत्या ग्रामीण जीवनाचे भाष्यकार, मराठवाड्यातील ग्रामीण जीवनाचे समर्थपणे वास्तव चित्रण करणारे जाणते साहित्यिक असा त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो.[१]

मराठवाड्यातील जीवनपध्दती, तेथील रीती, शेती; निसर्गाशी, मातीशी असलेला मानवी, पण प्रदेशनिष्ठ, वैशिष्टपूर्ण संबंध; तेथील एकूण संस्कृतीला लाभलेली काही प्रादेशिक वैशिष्टये; मानवी जीवनाला त्या प्रदेशानुसार पडलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक, ज्ञानविषयक मर्यादा व त्यातून उद्भवणारे प्रश्न आणि समस्या इ. गोष्टींनुसार अनुभूतीला लाभलेली वैशिष्टये बोराडे ह्यांच्या कथेत येतात. ह्या खास अनुभूतीतून बोराड्यांच्या कथेचे ग्रामीणत्व ह्या कारणांनी डोळ्यात भरते. तो अनुभूतीचा अपरिहार्य घटक म्हणून येऊ लागतो व ती कथा अस्सल ग्रामीण होते. ग्रामीण कथेची आरंभीची प्रेरणा ही जीवनातील वास्तववादी अनुभूतीतून निर्माण झाली आहे. नरहर कुरुंदकरांनी नेमके हे वर्तुळ पुढील मर्यादित शब्दात टिपले, ''ती समूहमनाला शरण गेलेल्या मान्य अतिसामान्यांची कथा आहे. वर्तुळाला छेद देऊन भुईनळयाप्रमाणे जळत उजळत खाक होणारे व्यक्तिमत्त्व या कथेचा विषय नाही. कण्हत, कुथत, कुढत, धुसफुसत ठरलेल्या वर्तुळालाच अगतिकपणे फिरणाऱ्या माणसांची ही कथा आहे.''[२] ह्या कथा लेखकाच्या जिवंत अनुभूतीकडे जाताना दिसतात. त्या समूहमनाला शरण गेलेल्या जनसामान्यांच्या कथा आहेत. बोराडे ह्यांचा जन्म मराठवाड्यातील काटगाव (ता.जि. लातुर) ह्या खेड्यात एका मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबात २५ डिसेंबर १९४० रोजी झाला. ग्रामीण माणसाची कुटुंबविषयक दृष्टी ही शहरी माणसाच्या दृष्टीपेक्षा काहीशी वेगळी असते. म्हणून बोराडयांनी ग्रामीण माणसाचे नाते संबंध सांगणाऱ्या कथा लिहिल्या. मनात पडलेल्या कथाबीजाचे भरण - पोषण ते सहजपणे करतात. ग्रामीण माणूस, त्याचे नातेसंबंध, त्यातून निर्माण होणारे भावनात्मक ताणेबाणे हा त्यांच्या कथालेखनाचा जिव्हाळ्याचा विषय आहे. मराठमोळ्या घरघराण्याचे चित्रण करणाऱ्या कुटुंबकथा लिहून त्याद्वारे सामाजिक व कौटुंबिक नातेसंबंधांवर त्यांनी प्रकाश टाकला. मराठवाडी माती नात्याचे अस्सलपण शोधणारी त्यांची संवेदनशीलता लक्षात घेण्याजोगी आहे.

## ५.२. रा. रं. बोराडे ह्यांची ग्रामीण कथा :

मराठवाडयाचे ग्रामीण जीवन चित्रित करणारे अनेक कथाकार आज पुढे येत आहेत. त्यापैकी रा. रं. बोराडे हे एक महत्त्वाचे कथाकार होत. आपल्या 'पेरणी' (१९६२), 'ताळमेळ' (१९६६), 'मळणी' (१९६७), 'नातीगोती' (१९७५), व 'कणसं आणि कडबा' (१९९४) इ. कथासंग्रहांमधून मराठवाडयातील ग्रामीण जीवन त्यांनी रेखाटले. त्यांच्या सुरवातीच्या कथांवर व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील व द. मा. मिरासदार ह्यांच्या कथांचा परिणाम जरी जाणवत असला; तरी उत्तरोत्तर त्यांची कथा स्वत:चा असा एक कलापूर्ण घाट शोधताना दिसते. जरी बोराडयांच्या कथालेखनाची सुरूवातीची प्रेरणा पूर्वसूरींच्या कथानुकरणाची असली, तरी पुढे त्यांच्या कथेने एक स्वतंत्र कलापूर्ण घाट निर्माण केला. पूर्वसूरींनी केलेले स्वातंत्र्यपूर्व चित्रण, पारतंत्र्यातील चित्रण, सरंजामशाही, रझाकारी अत्याचार व त्यात वावरणारा महाराष्ट्रातील ग्रामीण समाज व शेतकरी ह्यांचे चित्रण हीच बोराड्यांच्या प्रारंभीच्या लेखनाची प्रेरणा होती, हे त्यांच्या 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील कथांमधून दिसते. असे असले, तरी १९६० ला महाराष्ट्राची निर्मिती झाली. इंग्रजाबरोबर रझाकाराच्याही बेड्या तुटल्या आणि संपूर्ण महाराष्ट्र सजग झाला व येथून पूर्वसूरींचे अनुकरण करणारी बोराडयांची कथा हळूहळू स्वतंत्र रूप धारण करू लागली. तिला नवतेचे बाळसे येऊ लागले व त्यातूनच ती स्वत:चा एक वेगळा कलापूर्ण घाट निर्माण करू लागली. आज त्यांची कथा पूर्णपणे स्वतंत्र कथा आहे. तिने बदलते ग्रामजीवन, बदलता ग्रामीणसमाज, शेतकरी व शेतमजुर, बहुजन समाजातील स्त्रीजीवन, कौटुंबिक ताण-तणाव, ग्रामीण बालमन इ. विषयवैविध्यातून तिच्या परिपूर्णतेचा व स्वातंत्र्याचा ठसा उमटविला. ती प्रगल्भ बनली. 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहातील कथा वाचताना बोराडे ह्यांना त्यांचे स्वत:चे असे एक अनुभवविश्व सापडल्याचे जाणवते. बोराडयांच्या आधी मराठवाड्यातील ग्रामजीवन इतक्या समर्थपणे कथांमधून चित्रित झालेले दिसत नाही.

ग्रामीण जीवन, तेथील शेतकरी, त्याची आजची अवस्था ही बोराडे ह्यांच्या चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. तसेच बदलत्या ग्रामवास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांची कथा करताना दिसते. ग्रामीण स्त्री आणि तिच्या अनेक विध भावावस्था कमालीच्या वैविध्यपूर्ण रीतीने जिवंतपणे त्यांची कथा करताना दिसते. मराठवाडयाचा गाभा असलेला ग्रामीण समाज, त्यातील समूहमन, कुटुंबसंस्था, पिढयांमधील अंतर, बालमानाचे चित्रण, तसेच ग्रामीण भागात राहणाऱ्या माणसांची उलाढाल, दैन्य, दारिद्रय, कोंडामारा, यातना, उपेक्षा, अवहेलना, अगतिकता, हतबलता, ओढगस्तता, ताण, आर्थिक शोषण इत्यादींमधून भोगावे लागणारे दु:ख, जगावे लागणारे जिणे बोराडे ह्यांच्या साहित्यातून येते. ग्रामीण रूढी, परंपरा, रीतीभाती, जीवनपध्दती, नातीगोती, श्रध्दा - अंधश्रध्दा,

LIBRARY

आचार विचार व निर्मळ भाव ह्या संदर्भातील सर्व सामाजिक संकेतांचे दर्शन त्यांची कथा करते. तसेच खेड्यातील मानवी जीवनाशी एकरूप झालेली निसर्ग व प्राणिमात्र ह्यांच्यातील अटळ, अपरिहार्य, अन्योन्य संबंधाचे चित्रण बोराडे ह्यांची कथा करताना दिसते. नरहर कुरुंदकर 'वानवळा' च्या प्रस्तावनेत म्हणतात, ''जीवनातील बारीक - सारीक भावनांच्या हेलकाव्याची नोंद आपण करू शकतो काय, याचा बोराडे यांनी सतत प्रयत्न केला आहे. त्यासाठी ग्रामीण जीवन म्हणजे ग्रामीण जनतेचे समूहमन आणि या समूहमनातील सर्व लहान मोठे तरंग असे हे स्वरूप आहे. यातून त्यांच्या कथांच्या सामर्थ्याचा आणि मर्यादांचा उगम होत असतो.''[३]

ग्रामीण जीवनाशी बोराडे एकरूप झालेले आहेत. त्यामुळे ग्रामीण जीवनातील संकेत सांभाळणाऱ्या, त्याचा आग्रह धरणाऱ्या व्यक्तिरेखा त्यांच्या कथेत भेटतात. त्यामुळे त्यांच्या विनोदी कथांनाही समाजजीवनाच्या चित्रणाचा एक पदर चिकटलेला दिसतो. त्यांच्या विनोदाचा वानवळा काही वेगळाच आहे. ग्रामीण जीवनातील रम्य वाटणारी विसंगतता, अनेक लकबी, विचित्र सवयी, शारीरिक हालचाली, वागण्यातील ताळमेळ अथवा गैरमेळ विनोदाला कारण असतो. बोराडे ह्यांचा विनोद चटपटीत नाही; तर तो खुसखुशीत, शब्दनिष्ठ, प्रसंगनिष्ठ, स्थाननिष्ठ ह्यातून पाकळी - पाकळीने उलगडत जातो. 'पेरणी' (१९६२) ह्या त्यांच्या प्रारंभीच्या कथासंग्रहातील 'भल्या घरचे पाहुणे' ही विनोदी कथा वस्तुत: किस्सास्वरूपाची आहे. परंतु विनोदाखेरीज एक सामाजिकतेचे अंगही ह्या कथेला आहे.

बोराडे ह्यांच्या साहित्याचा आशय - आविष्कार पाहिला, तर आपल्याला निश्चितच जाणवते की, त्यांचा विकास व्यक्तिगत, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकारणात्मक विश्लेषण अशा वाटचालीतून झाला आहे. ग्रामीण जीवन हाच त्यांच्या सततच्या चिंतनाचा विषय राहिलेला आहे. ग्रामजीवन हीच त्यांची लेखननिष्ठा आहे आणि ह्या जीवनातील दु:खवेदना हीच त्यांच्या लेखनाची खरी प्रेरणा ठरली आहे. स्वत: बोराडे आपल्या कथेसंदर्भात म्हणतात, ''माझ्या बहुतेक कथांमधून मराठा समाज, या लोकांच्या जीवन जगण्याच्या पध्द्ती, त्यांचे आचार - विचार, त्यांच्या नीतिकल्पना, त्यांची श्रध्दास्थाने, त्यांचे सामाजिक संकेत व त्या निमित्ताने व्यक्त झालेल्या त्यांच्या भावभावना ह्यांचा अविष्कार आला आहे.''[४]

१९७० - ७५ पर्यंतचा कालखंड पाहिला, तर ह्या कालखंडातील बोराडयांची कथा ऐन तारूण्यात होती. स्वत: बोराडेच म्हणतात, ''साधारण १९७५ - ७६ सालापर्यंत मी झपाटल्यावानी कथालेखन केले.''[५] ह्या कथांमधून त्यांनी खेड्यापाडयातील बहुजन समाजातील शेतकरी व शेतमजुर ह्यांचे जगणे, त्यांचे नातेसंबंध, ह्या नातेसंबंधातून निर्माण झालेले भावबंध,तणाव, त्यांचे दैन्य, दारिद्रय,

दु:ख इत्यादींचे चित्रण केले आहे. बोराडयांच्या कथेतून शेतकरी व शेतमजुर ह्यांच्या दु:खदैन्याची, फरफटीची, अगतिकतेची चित्रणे आली. त्यांची कथा बालमनाचा विविध तऱ्हांनी वेध घेणारी अशीही आहे. त्यांनी मराठी कथेत बालमनाचे जाणीवपूर्वक लेखन केले, हे त्यांच्या 'पेरणी'(१९६२) ह्या पहिल्या कथासंग्रहातील 'सांगावा', 'झाड', 'भल्या घरचे पाहुणे', व 'अभ्यास' ह्या कथांमधून लक्षात येते. आनंद यादव त्यांच्या बालकथेविषयी लिहितात, ''लहान मुलाच्या दृष्टिकोणातून त्यांनी लिहिलेल्या कथा अनुभवाची एक वेगळीच छटा पकडतात. ग्रामीण कथेला ती नवीन आहे.''[६]

बोराडे ह्यांच्या कथेतील आणखी एक विशेष म्हणजे ग्रामीण स्त्रीजीवनाचे चित्रण हे होय. खेड्यातील स्त्रियांची होणारी मुस्कटदाबी, त्यांची मूक वेदना आणि त्यांची अपरंपार सोशिकता ह्यांचे चित्र बोराडे ह्यांनी मोठ्या आत्मीयतेने रंगविले आहे. त्यांच्या कथेच्या रूपाने ग्रामीण स्त्रीजीवनातील भेदक वास्तव आपल्यासमोर येते. ग्रामीण कथेला लाभलेला हा एक वेगळा विषय म्हणावा लागेल. बोराडे ह्यांच्या एकूण कथेबद्दल नरहर कुरुंदकर म्हणतात, ''बोराडे यांची कथा सतत समाजजीवनाचे चित्रण करते, संस्कृतीचे चित्रण करते. पण ती समाजशास्त्रात गुंतत नाही. ही कथा सतत शेती, शेती आणि माणूस याचे जागरूक भान ठेवते. पण ती कधी प्रचारात गुंतत नाही. माणूस आणि समाज सर्व सामर्थ्य,मर्यादा, गुणदोष, वैविध्य यांच्यानिशी समजून घ्यावा आणि समजून द्यावा, इतकेच आपले कार्य आहे, या जाणिवेचा तोल कधी या कथेत ढासळत नाही, यातच तिची खरी सिध्दी आहे.''[७] रा. रं. बोराडे त्यांच्या साहित्यावर 'मराठवाडा साहित्य परिषदे'त घेतलेल्या चर्चासत्राचा आढावा घेताना प्रसिध्द समीक्षक रा.ग. जाधव ह्यांनी म्हटले आहे, ''रावसाहेब बोराडयांची कथा वाचताना ती कधी नॉर्म होणार नाही. आणखी १०० वर्षानंतर त्यांची जर कथा घेतली ना किंवा पाचोळा वाचली ना, तर ती तितकीच भावेल, असं तिच्यामध्ये स्वरूप आहे. त्यांच्यामध्ये एक दु:ख आहे. दु:ख दॅट इज द मेन थिंग.''[८]

एकूणच रा. रं. बोराडे हे चतुरस्त्र लेखक आहेत. त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, वगनाटय, एकांकिका, समीक्षा इ. वाङ्मयप्रकारांमध्ये सरस लेखन केले. ७ कादंबऱ्या, ३ नाटके, ४ एकांकिकासंग्रह, २ वगनाटये, १ पथनाटय, १ समीक्षाग्रंथ, १ बालकादंबरी व १५ कथासंग्रह अशी त्यांची जवळजवळ तीसएक पुस्तके प्रकाशित झाली आहेत. परंतु त्यांचा पिंड हा कथाकाराचाच अधिक जाणवतो. म्हणून त्यांनी 'कथा' ह्या वाङ्मयप्रकाराकडेच जास्त लक्ष दिले असावे. 'वसुली' नावाची त्यांची पहिली कथा १९५७ साली 'सकाळ'च्या रौप्य महोत्सवी अंकात प्रसिध्द् झाली. परंतु पहिला कथासंग्रह प्रकाशित होण्यास १९६२ पर्यंत त्यांना थांबावे लागले. १९६२ साली त्यांचा 'पेरणी' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. तेव्हापासून ते जवळजवळ तीन - साडेतीन दशके कथालेखन करीत

आहेत. त्यांचा अलीकडचा कथासंग्रह 'कणसं आणि कडबा' हा १९९४ साली प्रकाशित झाला. एकूण १५ कथासंग्रहांमधून दोनशेहून अधिक कथा वाचकांसमोर आल्या. त्यांनी कथालेखनाबरोबर कादंबरी, नाटक, समीक्षा, बालकादंबरी अशा अन्य प्रकारचे लेखन केले असले, तरी त्यांची ओळख मात्र मराठी साहित्यात कथाकार म्हणूनच जास्त आहे.

रा. रं. बोराडे हे एक सिध्दहस्त ग्रामीण कथाकार आहेत. ग्रामीण जीवन हीच त्यांची लेखननिष्ठा आहे. ग्रामीण जीवनातील दु:ख, वेदना, स्पंदने ही त्यांच्या लेखनाची प्रेरणा आहे. 'पेरणी' ह्या त्यांच्या १९६२ साली प्रकाशित झालेल्या पहिल्या ग्रामीण कथासंग्रहातील कथा अभ्यासताना प्रथम हेच जाणवते. ह्या कथेवर 'पहिलेपणाचा', पूर्वसूरींचा परिणाम जाणवत असेलही, तरी पण हा परिणाम त्यांच्या कथालेखनावर फार काळ प्रभाव टाकू शकला, असे जाणवत नाही. त्यांनी अगदी पहिल्या कथासंग्रहातील पहिल्या कथेपासून ग्रामीण वास्तवाला हात घातला आणि तेथील पीळ, तेथील कर्जबाजारी शेतकरी, त्याचे दारिद्रय, त्याचे जीवन आणि त्या जीवनाची चिरफाड करणारे अधिकारी, हे अनुभव त्यांनी 'पेरणी' (१९६२) ह्या आपल्या पहिल्या कथासंग्रहातील कथांचे विषय बनविले.

एकूणच 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील सर्वच्या सर्व म्हणजे १४ कथांचा समग्र विचार करता, पहिल्या प्रथम जाणवते ती त्यांच्या ग्रामीण जीवनाच्या प्रकटीकरणाविषयीची प्रगाढ निष्ठा. ही निष्ठाच त्यांच्या कथांचे प्रेरणास्थान बनलेली आहे. ही प्रेरणास्थाने त्यांना मराठवाड्यातील औसा, लातुर, सारणी, मुरूड, किल्लारी, सास्तूर ह्या परिसरातील उघड्या - बोडक्या माळरानातील माणसांनी दिलेली आहेत. ह्या परिसरातील माणसे सतत काबाडकष्ट करणारी, मोलमजूरी करून आला दिवस ढकलणारी अशी आहेत. ह्या माणसांवर, शेतारानांवर बोराडे ह्यांचे अतिशय प्रेम आहे. इथला ग्रामीण माणूस सरंजामशाहीच्या जोखडाखाली पिचलेला आहे. ह्या सरंजामशाहीने आणि परावलंबी अस्मानी / सुलतानी संकटाने तो पुरता गांगरलेला आहे. त्यामुळे रूढी, परंपरा, प्रथा, ह्यांचा तो दास बनला आहे. हीच लेखनप्रेरणा बोराडे ह्यांनी कथालेखनाच्या अखेरपर्यंत जोपासलेली दिसते. परंतु सुरूवातीच्या काळातील लेखनाला प्रेरक ठरलेला शेतकरी व शेतकऱ्यांना साहाय्य करणारा मजुरवर्ग पुढील लेखनातून अधिक समंजस व आक्रमक मात्र बनलेला दिसून येतो.

अगदी अलीकडे १९९४ साली त्यांचा 'कणसं आणि कडबा' हा सध्या तरी अखेरचा कथासंग्रह प्रकाशित झाला. त्यात त्यांच्या २० कथा समाविष्ट आहेत. ह्या कथांच्या प्रेरणा ह्या 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील कथांसारख्या असल्या, तरी त्यातील व्यक्तिरेखा हा घटक अधिक तीव्रतेने, आक्रमकतेने, 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहातील कथांमधून आलेल्या दिसतात.

'पेरणी' (१९६२) मधील निमूटपणे अन्याय सहन करणारा शेतकरी 'कणसं आणि कडबा' (१९९४) मधून संघर्ष करताना दिसतो, आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संघटना स्थापन करून अधिक प्रगल्भतेने अन्याय, अत्याचार व शासनाच्या विरोधात लढताना दिसतो. येथे खऱ्या अर्थाने 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहामधील कथांपेक्षा 'कणसं आणि कडबा' (१९९४) मधील कथा अधिक विकसित आणि संघर्षमय दिसतात. ह्या संग्रहातील कथांमधून सुशिक्षितवर्ग, अधिकारीवर्ग व बदलत्या ग्रामजीवनाबरोबर बदललेला शेतकरी वर्ग ह्यांचे वर्तमानकालीन वास्तव चित्रण येते. म्हणून 'पेरणी' (१९६२) ह्या कथा संग्रहातील कथांपेक्षा 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहामधील कथा ह्या अधिक सकस व स्वयंपूर्ण वाटतात.

## ५.३. रा. रं. बोराडे ह्यांच्या कथालेखनाची वैशिष्टये :

रा. रं. बोराडे हे मराठवाडयाच्या मातीतून समर्थपणे उदयाला आलेले व सर्वात यशस्वी असे बी. रघुनाथांनंतरचे कथाकार होत. मराठी कथेच्या क्षेत्रात त्यांनी आपले स्वंतत्र स्थान निर्माण केले आणि मराठी कथेच्या समृध्दीला हातभार लावला. मराठी कथेपुरता विचार करावयाचा, तर प्रादेशिक अगर ग्रामीण अशा जीवनाचे चित्रण करीत असताना आपणास बोराडे ह्यांचे कथालेखन ग्रामीण समाजजीवनातील अनेक विषयवैविध्यातून पुढेपुढे सरकत असलेले दिसून येते. मराठी कथावाङ्मयातील त्यांचे स्थान शोधताना त्यांच्या कथांची काही वैशिष्टये विशेषत्वाने दिसून येतात. ह्या वैशिष्टयांच्या आढाव्यातून आपणास त्यांचे मराठी कथावाङ्मयातील स्थान स्पष्ट करून घेता येईल. ती वैशिष्टये पुढीलप्रमाणे :-

१. उत्कट व अस्सल ग्रामीण संवेदनशीलता, २. समर्थपणे ग्रामीण स्त्रियांच्या समस्यांचे चित्रण, ३. गांभीर्यपूर्वक सामाजिक समस्यांचे चित्रण, ४. कौटुंबिक ताणतणाव व भाविनक नातेसंबंधांचे उत्कट चित्रण, ५. मुक्या प्राण्यांच्या वेदनांचे बोलके चित्रण, ६. लैंगिक आकर्षण व भावनिक कोंडमारा ह्यांचे उत्कृष्ट चित्रण, ७. बालमनोविश्वाचे वैविध्यपूर्ण चित्रण ८. राजकारणाचा आणि गुंडगिरीचा खरपूस समाचार व ९. विनोदाचा वानवळा काही वेगळाच. क्रमाने ह्यातील एकेक वैशिष्टय आपण विस्ताराने जाणून घेऊ.

### *५.३.१. उत्कट व अस्सल ग्रामीण संवेदनशीलतेचा प्रत्यय :*

अस्सल ग्रामीणत्व तपासावयाचे झाल्यास ती कथा ग्रामीण जीवनावरच आधारलेली हवी. अस्सल ग्रामीणत्व आणि निर्माण कलाकृती ह्याच दृष्टीने ग्रामीण संवेदनशीलतेचा विचार महत्त्वाचा ठरतो. केवळ वरवरचे ग्रामीण तपशील भरून चांगली ग्रामीण कथा होऊ शकणार नाही. 'बावनकशी'

ह्या ना.सी. फडक्यांच्या कथासंग्रहात जवळजवळ निम्म्याहून अधिक कथा ग्रामीण परिसरावरच आहेत. फडक्यांना ग्रामीण जीवनाचा अनुभव नसल्याने केवळ चूष म्हणून त्यांनी ह्या कथा लिहिल्या. जो लेखक ग्रामीण जीवनात मोठा झाला असेल, घडला असेल, ज्याने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केला असेल; त्यांचीच संवेदनशीलता ग्रामीण असते. ग्रामीण भागातील जीवन हे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संबंधाने एकमेकांशी निगडीत असते.

मराठी साहित्याच्या अस्सलपणाचा प्रत्यय ग्रामीण संवेदनशीलतेच्या अंगाने पडताळून पाहता येईल. अनुभव कळण्याची व प्रकटीकरणाची वैशिष्टयेपूर्ण रीत म्हणजे संवेदनशीलता होय.

संवेदनशीलतेचा विचार करताना त्यात ग्रामीण व नागर असा भेद करता येतो. कारण खेड्यातील जीवन जगण्याची पध्दत व शहरातील जीवन जगण्याची पध्दत ह्यात मूलभूत फरक आहे. त्यामुळे शहरी संस्कार व ग्रामीण संस्कार हे भिन्नभिन्न दिसतात. खेडे म्हणजे एक मोठे कुटुंबच असते व ते सामुहिक रीत्या जगणारे असते. येथील प्रत्येक माणूस एक दुसऱ्याचा मित्र, ओळखीचा असतो. त्यामुळे गावातील प्रत्येक व्यवहार गावाच्या साक्षीनेच होतो. ह्याविरूध्द शहराची परिस्थिती असते.

ग्रामीण संवेदनशीलतेच्या बाबतीत गो. मा. पवार म्हणतात, " समाजातील सगळेजण एकमेकांशी बांधले आहेत. आपण या समाजाचा एक घटक आहोत, अशी जाणीव निर्माण होते. अशी जाणीव या व्यक्तीच्या ठायी निर्माण झाली म्हणजे ती जीवनाचा अनुभव स्वयंकेंद्रितपणे न घेता समाजशील वृत्तीने, मानवाच्या व्यापक भूमिकेवरून घ्यायला लागते. या प्रकारे अनुभव घेण्याची क्षमता व धाटणी म्हणजे ग्रामीण संवेदनशीलता होय. अशा प्रकारे अनुभव घेणाऱ्याने ग्रामीण जीवनाचा गाभा आत्मसात केला आहे, असे म्हणता येईल."[१]

ह्या अस्सल ग्रामीण संवेदनशीलतेच्या आधारे आपण असे म्हणू शकू की, व्यंकटेश माडगूळकर हे अस्सल ग्रामीण संवेदनशील साहित्यिक होत. त्यांच्या कथेत कोणतीही व्यक्तिरेखा सामाजिक स्वरूपाची असते. कधीच ती एकटी नसते. तिचा गोतावळा, तिचा समाज हा सतत तिच्याबरोबर असतो. त्याप्रमाणे रा. रं. बोराडे ह्यांच्या 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या दोन कथासंग्रहांमधील कथा ह्या अस्सल ग्रामीण संवेदनशीलतेचा प्रत्यय आणून देतात.

मराठी कथेत मराठवाडा, कोकण, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ अशा वेगवेगळ्या भागांचे चित्रण ग्रामीण ह्या नावाखाली येते. मराठवाडयातील ग्रामीण चित्रण रा. रं. बोराडयांएवढे इतर कोणाला करता आलेले नाही. आपल्या लेखनातून त्यांनी ग्रामीण संवेदनशीलता किती प्रभावीपणे मांडली आहे, ह्याचा प्रत्यय त्यांच्या 'पेरणी'(१९६२), 'ताळमेळ' (१९६६), 'मळणी'(१९६७) व 'कणसं आणि

कडबा' (१९९४) इ. कथासंग्रहांमधील कथांमधून येतो. ह्या कथासंग्रहांमधून मानवी जीवन, प्राणीजीवन, निसर्ग ह्यांच्या वेगळेपणातून ग्रामीण संवदेनशीलता जाणवते व एक वेगळेच भावविश्व समोर उभे राहते. येथे बोराड्यांची कथा एक वेगळाच कलापूर्णघाट निर्माण करू लागते. ग्रामीण शेतमजुर व बहुजन समाजातील स्त्रीजीवन, कौटुंबिक ताणतणाव, ग्रामीण बालमनोविश्व अशा विविध विषयांना त्यांच्या कथेने स्पर्श केला, हे 'पेरणी'(१९६२) ह्या कथासंग्रहातील कथांमधून दिसते. त्यांच्या कथेत निसर्गाला नुसतेच एक महत्त्वाचे स्थान आहे, असे नाही; तर कथांचा अपरिहार्य भाग म्हणून निसर्ग त्यांच्या कथेत येतो व निसर्गवर्णनातून त्यांची कथा उभी राहते. भावनांचे वेगवेगळे पदर एखाद्या संवादाच्या, वाक्याच्या हेलकाव्याने उलगडून दाखवायचे, हे सर्वसामान्यपणे बोराडे ह्यांच्या कथेचे वैशिष्ट्य आहे. 'तोल' मधील संवाद वाचकांना गहिवरून टाकतात. इतर साहित्यकांची जी जीवनदर्शनाची प्रेरणा असते, तीच ग्रामीण साहित्यिकाचीसुध्दा असते. अनुभवाच्या दृष्टीने ग्रामीण साहित्य संपन्न आहे. त्यात वेगवेगळ्या जातीजमाती, ताणतणाव, नियती आणि माणूस ह्यांचा संघर्ष ह्यांचे चित्रण येते. ग्रामीण समाजातील नातीगोती, कुटुंबप्रधान संस्कृतीच्या मर्यादा, स्त्रियांच्या जीवनातील विविध सुखदु:खे स्वाभाविकपणे बोराडे ह्यांच्या कथेतून येतात. 'बोळवण' (१९७६) हा त्यांचा संपूर्ण कथासंग्रह स्त्रियांच्या दु:खासंदर्भात अभ्याण्याजोगा आहे, तर बालमनोविश्वाचे चित्रण 'पेरणी' (१९६२) व 'मळणी' (१९६७) ह्या कथासंग्रहांमधील काही कथांमधून दिसते. त्यांच्या कथेने ग्रामीण परिसराशी व तेथील मातीशी इमान राखून ग्रामीण भाग सजीव व अमर केला. ग्रामीण जीवनातील अनेक विषयांना त्यांच्या कथेने स्पर्श केला. त्यातून जाणवणारी उत्कट संवेदनशीलता हेच बोराडे ह्यांच्या कथेचे खास वैशिष्ट्य म्हणता येते.

### ५.३.२. *समर्थपणे ग्रामीण स्त्रियांच्या समस्यांचे चित्रण:*

रा. रं. बोराडे ह्यांची कथा मराठवाड्याच्या ग्रामीण मातीतून जन्माला आली. ह्या भागातील माणसे, त्यांची भाषा, त्यांच्या भावना, त्यांच्या वाट्याला येणारी सुखदु:खे, त्यांच्या सभोवतीचा परिसर ह्या सर्वांचे अतिशय सूक्ष्म, प्रत्ययकारी, तपशीलवार व गहिरे चित्रण त्यांच्या कथांमूधन येते. जीवननिष्ठा हेच मानवीयतेचे प्रमुख लक्षण म्हणून त्यांनी स्वीकारलेली दिसते. मानवातील ह्या निष्ठेचा प्रबळ साक्षात्कार ग्रामीण भागात होतो व तेथील सर्वच स्त्रीपुरूषांच्या जीवनाची प्रेरणा निष्ठाच असल्याचे दिसते. त्यातही पुरूषापेक्षा स्त्रिया ह्या ही निष्ठा अधिक व्यक्त करतात. त्यामुळे बोराडे ह्यांच्या व्यक्तिरेखा अधिक उठून दिसतात. त्यांच्या कथांमधील स्त्री ही पुरूषाइतकेच, किंबहुना त्याच्याहूनही अधिक महत्त्वाची आहे. ती तरुण पत्नी असो, वृध्द आई असो, प्रौढ भगिनी असो, की सासू असो, अंतिमत: ती जीवनाचे सातत्य सांभाळणाऱ्या धरित्रीची भूमिका पार पडत असते.

बोराडे ह्यांनी खेड्यातील स्त्रियांचा अगतिकपणा, असाहाय्यपणा, कथाविषय करून ग्रामीण कथेला अधिक सूक्ष्माकडे नेण्याचा प्रयत्न केला. ह्यापूर्वी हे स्त्रीचित्रण इतक्या सहजपणे, आलेले नाही, ह्याची बोराडे ह्यांना खंत वाटते, ते म्हणतात, ''खेड्यातील शेतकरी, शेतमजुर स्त्रियांचं वास्तव चित्रण ज्या प्रकर्षानं व प्रभावीपणे मराठी ग्रामीण वाङ्मयात यावयास हवं होते, त्यानुसार ते आलेलंच नाही. खेड्यातील या स्त्रियाकड नेहमी शृंगार किंवा विनोदाच्या विषय म्हणून ग्रामीण कथेनं पाहिले आहे. श्री. व्यंकटेश माडगूळकर किंवा श्री. शंकर पाटील यांच्या ग्रामीण वाङ्मयातून खेड्यातल्या स्त्रीच्या वास्तव जीवनाचं चित्र आलेलं असले, तरी ते पुरेशा प्रमाणात आलेलं नाही. ग्रामीण भागातल्या स्त्रियांना सर्वस्वी घरातील पुरूषावर अवलंबून रहावं लागत असल्यामुळे त्यांना स्वतंत्र जीवन जगताच येत नाही. घरात नेहमी त्यांना दुय्यम स्थान असतं. 'रांडवणाचं' किंवा 'नवऱ्यानं' टाकून दिलेलं जीवन तिला जगावं लागतं, तेव्हा तर तिचं दु:ख अधिक गड्डद आणि जीवघेणं असतं. माझ्या कथांतून अशा अनेकविध स्वरूपाच्या स्त्रिया आलेल्या आहेत.''[१०] स्त्रियांच्या समस्या, अडीअडचणी, भावनिक ताणतणाव, सामाजिक पिळवणूक इ. प्रश्नांची उकल करण्याच्या दृष्टीने 'बोळवण' (१९७६) ह्या कथासंग्रहातील प्रत्येक कथा स्त्रियांच्या दु:खाना जिवंत व बोलके करताना दिसते.

खेडेगावात राहणाऱ्या निरनिराळ्या अवस्थांमधील आणि निरनिराळ्या वयांमधील स्त्रियांच्या वाटयाला एक उपभोगाची वस्तू म्हणून नाना तऱ्हेने भोग आलेले असतात. त्यातील काही दारिद्रयाने, काही जनरीतीने, तर काही मोहातून आलेले असतात. हे आकलन बोराडे ह्यांनी फार नेमकेपणाने आणि कणवेने भरलेले आहे. अशा प्रकारे ग्रामीण समाजातील स्त्री ही तिच्यावर होणारे अन्याय - अत्याचार, तिची होणारी भावनिक कुचंबणा, तिचे मानसिक ताणतणाव, तिची सुखदु:खे, उच्चवर्णीयांकडून होणारी तिची कुचंबणा ह्या व अशा अनेक प्रश्नांना तोंड देते. तसेच दैन्य, दारिद्रय, दैवाधीनता, भावनिक उपासमार, उपसावे लागणारे कष्ट व करावी लागणारी भावनांची होळी अशा स्थितीतील स्त्रिया रा. रं. बोराडे ह्यांच्या कथांमधून पहावयास मिळतात. त्यांच्या कथेचा हा एक महत्त्वाचा विशेष आहे. सृजनशक्तीचे प्रतीक, धरणीमातेचे रूप म्हणून स्त्री उभी आहे. स्त्रीसमस्यांच्या आशयघनतेमुळे 'पेरणी'(१९६२), 'मळणी' (१९६७) व 'बोळवण' (१९७६) ह्या कथासंग्रहांमधील कथांना फार मोठी उंची लाभलेली दिसून येते. एका मुलाखतीमध्ये स्वत: बोराडे आपल्या कथेबद्दल म्हणतात, ''ग्रामीण स्त्रीचं सुखदु:ख, तिच्या व्यथावेदना माझ्याइतक्या समर्थपणे अन्य कुणीही ग्रामीण साहित्यिकांनी मराठीत आणल्या नाहीत.''[११]

अशाच प्रकारच्या दु:खाच्या झळा 'पेरणी'(१९६२) ह्या कथासंग्रहातील 'बलामत' ह्या कथेमधील स्त्रीला लपेटून जातात. लग्न होऊन अंगची हळद पुसते की नाही, तोपर्यंत तिचा पती परागंदा

होतो. पतीच्या अशा अचानक जाण्याने ह्या स्त्रीवर आभाळच कोसळते व एक दिवस ती दीराच्या वासनेला बळी पडते. ह्या वेळी ती पतीची धनदौलत, इस्टेट सोडून भावाकडे राहणे, त्याच्या शेतात मोलमजुरी करणे पसंत करते.[१२] अशा प्रकारे बोराडयांनी चित्रित केलेल्या स्त्रीव्यक्तिरेखा ओढावलेल्या परिस्थितीशी खंबीरपणे सामना करताना दिसतात. तसेच त्यांच्या स्त्रीचित्रणामधून प्रत्ययला येणारा हा सामाजिक आयाम कथेचा एक महत्त्वाचा विशेष आहे. त्यामुळे ही स्त्री सबंध सृजनशक्तीचे प्रतीक म्हणून धरणीमातेचे रूप घेऊन उभी राहते. म्हणूनच बोराडे ह्यांची कथा मराठीलाच नव्हे, तर जगातील कोणत्याही भाषेला उपयोगी ठरावी, एवढी उंची गाठते. त्यामुळे मराठी कथावाङ्मयात रा. रं. बोराडे ह्यांचे स्थान अद्वितीय असे आहे.

### ५.३.३. *गांभीर्यपूर्वक सामाजिक समस्यांचे चित्रण:*

ग्रामीण कथेचा महत्त्वाचा विषय भूक हा आहे. ह्या दृष्टीने 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहातील 'तोल' ही कथा वास्तवाच्या पलीकडे अतिवास्तववादातून जन्मल्यासारखी वाटते. कथेच्या सुरूवातीला ह्या कथेतील स्त्री आपल्या नवऱ्याला म्हणते, हातावरचे आपले पोट, रोज कमाई केली, तरच रोजची चूल पेटेल, ह्याची जाणीव करून देते, येथे घरातील ह्या स्त्रीला आपली मुले जेवली की पोट रिकामेकरून येतात आणि भूकभूक करतात, हाच मुख्य चीड आणणारा प्रश्न वाटतो. भुकेच्या ह्या प्रश्नाने बाई अगतिक होते. नवरा, मुले आणि आपण जगलो, पाहिजे, असे तिच्या समोर संकट असते. असे वास्तवतेचे करूण, दाहक चित्रण बोराडे ह्यांनी आपल्या कथांमधून करून त्यांनी समाजातील वास्तव प्रश्नाचीउकल केली, हे 'तोल' ह्या कथेतून दिसते.[१३]

कुटुंबविषयक जाणिवा केंद्रस्थानी असणारी मुले, समग्र ग्रामवास्तव, सामान्य शेतकरी,शेतमजुर व बलुतेदार, त्यांचे दैन्य, फरफट व अगतिकता, तसेच अस्पृश्यांचे कितीतरी अनुभव बोराडे चित्रित करतात. हे बोराडयांच्या कथालेखनाचे मुख्य विषय होत. त्यांची कथा केवळ कुटुंबातच अडकून पडत नाही, तर ती समग्र ग्रामवास्तव आपला विषय बनवते. तिच्यात गुराढोरांसह साकारणारा निसर्ग त्या परिसराच्या पर्यावरणासह व्यक्त होत जातो. अन्नाची भूक व वासनेची भूक ही जेव्हा प्रमाण बनते, तेव्हा कथेतील व्यक्ती ह्या भुकेच्या प्राप्तीसाठी कशा धडपडतात, हे मुळातून पाहण्याजोगे आहे. अशा प्रकारच्या सामाजिक प्रश्नांना बोराडयांच्या कथेने जवळून स्पर्श केलेला आपणास दिसतो. म्हणूनच ग्रामवास्तवतेचे एकएक पदर त्यांची कथा उलगडून दाखविण्यात यशस्वी ठरते. त्यामुळे मराठी कथावाङ्मयामध्ये रा. रं. बोराडे ह्यांचे स्थान अनन्यसाधारण असल्याचे दिसून येते.

### ५.३.४. *कौटुंबिक ताणतणाव व भावनिक नातेसंबंध ह्यांचे उत्कट चित्रण :*

माणूस आणि कुटुंब, कुटुंब आणि समाज अशा विविध, स्तरांवरील अनुभव चित्रित करताना माणूस पणाचे विविध आयाम बोराडे ह्यांनी साकार केले आहेत. ग्रामीण स्तरातील माणूस जीवन जगत असताना कितीतरी अनुभव, प्रसंग जोपासत असतो. ह्या माणसाची नातीगोती हा बोराडयांच्या चिंतनाचा, ध्यासाचा आणि आवडीचा अनुभवविषय आहे. नात्याच्या संबंधाचे भावनिक रूप विविध ताणतणावांमधून त्यांची कथा साकारते. त्याच बरोबर रीतीरिवाज मानपान इ. गुंता बोराडयांची कथा सहजासहजी व्यक्त करते.

नात्यागोत्यातील ताणतणाव व उद्‌भवणारे भावनिक संघर्ष बोराडे मोठया उत्कटतेने चित्रित करतात. 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील कथांमधून हे दिसते. 'गाठोडं' ह्या कथेमधील जनाई आजारपणात अखेरच्या अवस्थेत तळमळत असते. नवरा लिंबाजी आणि मुलगा गंगाराम जनाईला तालुक्याला दवाखान्यात इलाज करण्यासाठी नेण्याचे ठरवितात. परंतु जनाई आपली विवाहित मुलगी रूख्मा हिला बघितल्याशिवाय घर सोडायला तयार नसते. अखेर रुख्मा बैलगाडीतून येते. तिच्याबरोबर जावईपण आलेला असतो. जावई बघताच लिंबाजी व मुलगा गंगाराम हे हबकून जातात. कारण पहिल्यांदाच जावई घरी आलेला असतो व आहेराचा प्रश्न त्यांच्या डोळयासमोर उभा राहतो. जनाईला जगण्यापेक्षा जावयाचा मानपान महत्वाचा वाटतो. शेवटी साऱ्याच वाटा बंद झाल्याने लिंबाजी गाडीत गाठोडं टाकल्यासारखा आहेर आणण्यासाठी बसतो. येथे जावयाच्या मानापानासाठी प्रसंगी मृत्यू पत्करणारी, पण मानपान सांभाळणारी माणसे दिसतात.

काही माणसे शेवटी नात्यागोत्यात कशी अडकून पडतात, ह्याचे उत्तम उदाहरण म्हणून 'मुराळी' ही 'कणसं आणि कडबा'(१९९४) ह्या कथासंग्रहातील कथा लक्षणीय वाटते. उमद्या मनाचा एकनाथ आपल्या बहिणीला 'मूळ' म्हणून जाण्याचे निमित्त करून कावेरीला पळवून आणण्याच्या बेताने आईला 'शिदोरी' करण्यास सांगतो. गयाबाईला ह्याचे आश्चर्य वाटते. एकनाथ व कावेरी ह्यांची कावेरीच्या लग्नापूर्वी लगट असते. परंतु कावेरी सांगवीच्या एका इसमाशी लग्न होऊन सासरी गेलेली असते. अखेर कावेरी पतिसहवासात पूर्णपणे बदलेली पाहून एकनाथही पूर्णपणे बदलतो व मूळ म्हणून आलोच आहे. तर हे नाते निभवायचे, हे मनाशी तो ठरवतो.[१४]

बोराडयांच्या 'कणसं आणि कडबा'(१९९४) ह्या कथासंग्रहामधील बऱ्याच कथा बोराडयांच्या मूळ प्रकृतिधर्मानुसार नात्यागोत्याचे नवे संदर्भ दाखवीत काही शेतीविषयक प्रश्नांचीही उकल करताना दिसतात. 'वेस', 'अवर्षण', 'कणसं आणि कडबा', 'भरती, 'कर्जमुक्ती' व 'वेढा' ह्या कथा तशा होत.

माणसातील माणूसपण जिवंत राखण्यास हातभार लावणाऱ्या कथा म्हणून त्या एक विशिष्ट उंची गाठतात.

### ५.३.५. *मुक्या प्राण्यांच्या वेदनांचे बोलके चित्रण :*

ग्रामीण माणसांच्या वास्तवचित्रणाबरोबरच ग्रामीण भागातील मुक्या प्राण्यांच्या व्यथावेदना, दु:ख - यातना, कळा देखील बोराडयांच्या नजरेतून सुटत नाहीत. अशा प्रकारे मराठी कथेला माणसांच्या पलीकडे नेण्याचे प्रथम श्रेय बोराडे ह्यांनाच जाते. प्राण्यांच्या व्यथा बोराडयांना लेखनास प्रवृत्त करतात. ह्या दृष्टीने 'सत्यानाश' ही कथा लक्षणीय ठरते. बाबालाल ह्या धर्मांध मुसलमानाने मारून-मारून मरणासन्न, रक्तबंबाळ केलेल्या रावळया वासराचे चित्रण ह्या कथेमधून येते.

भीषण दुष्काळ आणि त्याचे अनिष्ट परिणाम, दुष्काळात माणसाची, त्याचबरोबर मुक्या प्राण्यांची होणारी उपासमार हे कथाबीज मनात घेऊन बोराडयांनी 'होरपळ' ही कथा लिहिली. पुढे हीच कथा 'चारापाणी' (१९९०) ह्या कादंबरीमध्ये त्यांनी रूपांतरीत केली. ह्या कथेतील मुक्या प्राण्याच्या आशयाशी बोराडे ह्यांची 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहातील 'कणसं आणि कडबा'ही कथा समानता साधताना दिसते. ही कथा सुखदेवभोवती केंद्रित होते. तसेच चारा नाही म्हणून गावातील सारे बैल सावकार आबाराव शेळके ह्यांच्या शेतावर चाऱ्यासाठी मोफत राबतात. ह्याचा प्रतिकार म्हणून एक दिवस सुखदेव शेतकऱ्यांना संघटित करून तहसील कार्यालयासमोर 'मेख रोखो आंदोलन' करतो व प्रत्येक बैलाच्या शिंगात 'आम्हाला चारा द्या' अशा कागदी पाटया लटकावतो.[१५] बैलांना तहसीलमधून चारा मिळवण्याबाबत व कॅटलकॅम्प चालू करण्याबाबत सुखदेवला यश येते. अशा स्वरूपाचे मुक्या प्राण्यांचे दु:ख मानवी पातळीवर चित्रित करण्यात बोराडयांएवढे दुसरे कोणी यशस्वी झालेले दिसत नाही. मुक्या प्राण्यांच्या बोलक्या मागण्यासाठी बोराडे ह्यांच्या 'पेरणी' (१९६२) व 'कणसं आणि कडबा'(१९९४) ह्या दोन कथासंग्रहांमधील काही कथा संघर्ष करताना दिसतात. प्राण्यांच्या दु:खांना बोलके करण्यासाठी बोराडयांनी जे काही लेखन केले, ते मराठी कथेला नवीनच म्हणावे लागेल.

### ५.३.६ *लैंगिक आकर्षण व भावनिक कोंडमारा ह्यांचे उत्कृष्ट चित्रण :*

लैंगिक आकर्षण हा बोराडयांच्या कथांचा एक वेगळाच कुतुहलाचा विषय आहे. ह्या विषयाला अनुसरून बोराडयांनी ज्या काही कथा लिहिल्या, त्या अत्यंत उत्कृष्ट व परिणामकारक अशा आहेत. 'पेरणी' (१९६२) ह्या त्यांच्या पहिल्या,कथासंग्रहातील 'हुरडा' सारखी बेहोश आनंदाची कथा पाहिली तर एका बाजूने ती वासनेचे चित्रण करणारी आहे, असे वाटते. ह्या कथेतील बाजीचे पत्नीशी

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

अल्पवयात लग्न झालेले असते. पुढे त्याची पत्नी जेव्हा वयात येते व हे त्याला कळते, तेव्हा त्यास जो आनंद होतो, तो ह्या कथेत आलेला आहे. पत्नी वयात आली, हे कळल्यानंतर बाजी बेहोश होऊन शेताकडे धावत सुटतो. नितळसंग आकाश, हुरडयाचे दिवस, रानचिमण्या -भोरडया सूर मारीत होत्या. शेताशेतातून आकटया पेटल्या होत्या व सखा कातळे सहज बोलावे म्हणून बोलला, ''ये बाजी! हुरडा खायला'' आणि धावताधावता त्याच धुंदीत बाजी म्हणाला, ''आमच्या बी शेतात झालाय की आता हुरडा.''[१६]

भावनिक कोंडमारा, मानसिक ताणतणाव, व्याह्यांचे आपापसातील व्यवहार, त्यामुळे निर्माण झालेला ताण व त्यातून होणारी भावनिक कुचंबणा ह्यांचे चित्रण 'हुंदका', 'मळा' व 'पेरणी' ह्यासारख्या कथांमधून येते. शेतीवाडीच्या, इस्टेटीच्या मोहामुळे 'पेरणी' ह्या कथेतील बळी बायकोच्या बहिणीबरोबर दुसरे लग्न करण्याची इच्छा मनात बाळगतो, मेहुणीच्या वाटयाला आलेली शेतजमीन काळीभोर, सुपीक आणि बागायती असते, 'हे वावर पडीक असताना आपणच रंगारूपाला आणले, मग हे हातचे जाऊ नये', असे बळीला वाटते शेतीवर अवलंबून असलेल्या माणसांच्या वासनेला दिशा आणि आकारसुध्दा शेतीमुळेच कसा येतो, ह्या दृष्टीने 'पेरणी' ही कथा लक्षणीय वाटते.[१७] बोराडयांनी लिहिलेल्या ह्या आणि अशा आणखी कितीतरी कथा भावनिक कोंडमार आणि लैंगिक आकर्षण ह्यांच्यापोटी निर्माण झालेल्या दिसून येतात. लैंगिक आकर्षण हा बोराडयांच्या कथेचा एक महत्त्वाचा विषय आहे. परंतु ह्या विषयाकडे ते अजून तरी गांभीर्याने वळले नाहीत, असे वाटते,

### ५.३.७. *बालमनोविश्वाचे वैविध्यपूर्ण चित्रण :*

मराठावाडयातील ग्रामीण जीवनाचे दर्शन आपल्या कथाविश्वातून रा. रं. बोराडे ह्यांनी मोठ्या सामर्थ्याने घडविले आहे. त्यांच्या कथांमधून आलेल्या बालमनाच्या चित्रणातील विविधतासुध्दा लक्षात घेण्यासारखी आहे. बोराड्यांच्या कथाविश्वातून जेवढया सामर्थ्याने, विविधतेने आणि उत्कटतेने बालमनाचे चित्रण येते, तेवढे क्वचितच इतरांच्या कथांमधून येते. कथानुभवाच्या संदर्भातच बालमनाचे चित्रण ते करतात. उनाडपणा करणारा, आईला खोटे बोलणारा, बायडीची चेष्टा करणारा सोन्या 'अभ्यास' ह्या कथेमधून दिसतो. त्याच्या चमत्कृतिजन्य वागण्याचे वर्णन पहा: आपण सतत एकाच वर्गात नापास होतो म्हणून आईच्या दाव्याचा रपाटा पाठीवर बसणार, असे दिसताच सोन्याने काखेतले वर्तमानपत्र काढले व जमिनीवर पसरीत तो आईला म्हणाला, ''आये! मारतीय मार, पट्टे. पर ह्यात लिहलंय ते आइक आगुदर.'' ''त्यात काय डोंबलं तुजं लिव्हलंय, व्हय रं?''

''आगं, आईक तर आगुदर''

आणि तिनं संमती देण्याच्या आतच मी त्यात न लिहलेलं वाचू लागलो, " लातुरच्या साळंमंधी एक पोरंग व्हतं, ते चवथीत नापास झालं. त्याला वाईट वाटलं. त्यानं हिरीत जाऊन जीव दिला व त्यामुळं त्याचा पराण गेला. त्याच्या मायबापाला बी लय दुःख झालं, त्यांनी बी रडूनरडून पराण सोडला."[१८] येथे बालमनाचा चतुरपणा असा व्यक्त झाला आहे.

कावळ्यांची लागण बघून घाबरणारा यंका ('सांगावा'), नाना प्रश्न विचारून आपल्या मामाला सतावून सोडणारा छगन ('भल्या घरचे पाहुणे'), आपल्या वडिलांचा घाबरेपणा लक्षात न येणारा निरागस सिरंगा ('झाड'), लग्न म्हणजे काय, नवरा म्हणजे काय, हे न समजून नेसलेले लुगडे फराफरा फेडणारी आणि लग्नाच्या वेळी झोपी जाणारी मुलगी ('लगीन'), दिवाळीच्या बाजारासाठी बरोबर लातुरला जाणारा ग्यानबा ('दिवाळी') ह्या व अशा अनेक कथांमधून बोराडयांनी बालकांच्या मनाचे दर्शन घडविले आहे. बालमनाचे दर्शन घडविताना ते बालमनाशी एकरूप होतात व बालकांच्या नजरेतून ते इतर घटनाप्रसंगांकडे पाहतात. बालमनाचे दर्शन घडविणाऱ्या ह्या कथा एका अर्थाने कुटुंबकथाही आहेत.

बोराडयांनी साकारलेली हे बालकांचे भावजीवन मराठवाडयातील निसर्गाच्या सानिध्यात आकाराला येते. बालमनाचे हे चित्रण जिवंत होण्यास ग्रामीण बोलीभाषेतील निवेदनही मदत करते. अशा विविधतेतून बोराडयांची कथा बालमनोविश्वाचा धांडोळा घेते.

### ५.३.८. *राजकारणाचा व गुंडगिरीचा खरपूस समाचार :*

बोराडे ह्यांनी मराठवाडयातील राजकीय हालचाली, गुंडगिरी व त्यामुळे निर्माण होणाऱ्या ताणतणावाचे चित्रण करणाऱ्या काही कथा लिहिल्या. 'पेरणी' (१९६२) ह्या कथासंग्रहातील 'सत्यानाश' ही तशी कथा असून मराठवाडयातील रझाकारी अत्याचारी पार्श्वभूमी तिला लाभलेली आहे. ह्या कथेत बाबालालच्या मारहाणीमुळे मरणासन्न झालेले वासरू व त्याच्या वेदनांमुळे दुःखाने ढवळून निघालेले रंगरावाचे कुटुंब ह्यांचे चित्रण आलेले आहे. ह्या कथेत धर्मांध ताणतणाव अव्यक्त राहून एका गावगुंडाचे सरळमार्गी माणसाचा केलेला छळ असे ह्या कथेचे स्वरूप आहे.[१९]

गावच्या राजकारणाचे सांगोपांग चित्रण करणारी 'वेस' ही 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या कथासंग्रहातील कथा लक्षणीय ठरते. ह्या कथेतून गावपातळीवरील दलित प्रश्नाचेही भान बोराडे ठेवतात. ग्राम पंचायतीच्या मेंबरापासून सरपंचापर्यंत व ठराव जिंकण्यापासून ते हाणून पाडण्यापर्यंतच्या राजकारणाचा खरपूस समाचार ही कथा घेते. येथे गावातील राजकारणात दलितांचा कसा वापर करून घेतला जातो, ते स्पष्ट केले आहे. गावचा सरपंच केला म्हणून रंगनाथराव हा दलित ग्राम पंचायत मेंबर

केरबाच्या वायकोला वाडयावर बोलावतो वगैरे गोष्टीमधून उच्चवर्णीय एनकेन प्रकारे दलितांची कशी ससे होलपट करतात, ते स्पष्ट केले आहे.[२०]

### ५.३.९. *विनोदाचा वानवळा काही वेगळाच:*

रा. रं. बोराडे ह्यांच्या कथेतील विनोदाचा वानवळा काही वेगळाच आहे. ग्रामीण जीवन, तेथील रीतिरिवाज, वागण्यातील विसंगती, माणसाच्या लकबी, विचित्र सवयी, शारीरिक हालचाली, वागण्यात असलेला गैरमेळ असे विनोदाचे सारे बारकावे बोराडे ह्यांनी आपल्या लेखनात आणले आहेत. त्यांचा विनोद केवळ किश्श्याचा नाही, तर ग्रामीण माणसाच्या अंगी सहज स्वाभाविक मुरलेला असा तो आहे. अतिशयोक्ती, कृत्रिमता किंवा पराकोटीची विसंगती त्यांच्या विनोदात सापडत नाही. सहज स्वाभाविक घटना - प्रसंगांशी प्रामाणिक राहून तो उद्‌भवतो. विनोदाबरोबरच समाजजीवनाच्या चित्रणाचा पैलूही ह्या कथांना चिकटलेला दिसतो. समग्र कथेत बोराडयांचे हे निराळेपण म्हणता येईल.

बोराडयांनी अगदी प्रारंभीच्या काळापासून विनोदी कथा लिहिल्या. 'पेरणी' (१९६२) ह्या त्यांच्या पहिल्या कथासंग्रहामधील एकाद दुसरी कथा विनोदी आहे. मात्र 'ताळमेळ'(१९६६) हा त्यांचा दुसरा कथासंग्रह पूर्णपणे विनोदाचा प्रत्यय देतो. नंतरच्या काळातील 'मळणी'(१९६७), 'वरात'(१९७३), 'नातीगोती'(१९७५), 'वाळवण'(१९७६), 'फजितगाडा'(१९७६), 'राखण'(१९७८), 'गोंधळ'(१९७८) व 'हेलकावे'(१९९०) ह्या सर्व कथासंग्रहांमधूनही त्यांचा विनोदी कथा पहावायास मिळतात.

बोराडयांच्या समग्र कथालेखनातील विनोदाचा शोध घेता एक बाब प्रकर्षाने जाणवते. ती अशी की, त्यांच्या कथालेखनाची प्रवृत्तीच मुळात गंभीर आणि वास्तववेधी आहे. ग्रामीण मातीशी, ग्रामीण माणसाशी ती इमान राखणारी आहे. त्यामुळे त्यांच्या विनोदी लेखनातून एखादी व्यक्तिरेखा केवळ सवयीने, लगबीने स्वभावाने फारतर हास्यापद होईल, परंतु संपूर्ण ग्रामजीवन कधीच हास्यापद ठरत नाही. प्रसिध्द समीक्षक नरहर कुरुंदकर लिहितात, ''ग्रामीण भागाशी आणि विशेषत: तेथील समाजमनाशी बोराडे इतके समरस झालेले आहेत की, खेडे हा त्यांचा उपहासाचा विषयच होऊ शकत नाही.''[२१] ह्याचा अर्थ विनोदनिर्मितीच्या मुळाशीही बोराडयांची दृष्टी केवळ चिंतकाची, शोधकाची असते, हे लक्षात येते.

### ५.४. समारोप :

अशा प्रकारे रा.रं. बोराडे ह्यांच्या कथालेखनाबाबतचे निष्कर्ष आणि निरीक्षणे त्यांच्या 'पेरणी'(१९६२) व 'कणसं आणि कडबा' (१९९४) ह्या दोन कथासंग्रहांच्या अभ्यासातून आपल्या

हाती येतात. त्यांच्या सामर्थ्याचा, ग्रामीण कथाकार म्हणून त्यांनी केलेल्या कार्याचा व त्याचबरोबर त्यांच्या मर्यादांचा विचार करता असे लक्षात येते की, ग्रामीण कथेच्या क्षेत्रातील त्यांचे कार्य ऐतिहासिक व विशेष उल्लेखनीय असे आहे. ग्रामीण कथा किंबहुना एकूणच मराठी कथा ह्यांच्या जडणघडणीत, समृध्दीत त्यांचा वाटा महत्त्वाचा व मोलाचा आहे. मराठी कथेचा प्रवाह समृध्द आणि संपन्न करण्यात ज्या ज्या साठोत्तरी कथाकारांनी योगदान दिले, त्यामध्ये रा. रं. बोराडे ह्यांचे स्थान फार वरचे आहे, हे स्पष्ट होते. मराठी ग्रामीण कथेला समृध्द अनुभवविश्व बहाल करून रा.रं.बोराडे ह्यांनी मराठी साहित्यात ग्रामीण कथाकार म्हणून आपले स्थान अढळ करून ठेवले आहे, हे नक्कीच!

बोराडयांच्या ग्रामीण कथेतील स्थानाबद्दल नरहर कुरूंदकर म्हणतात, ''मराठी कथेत ज्यांनी आपले स्थान निर्माण केले आणि मराठी कथेच्या समृध्दीला हातभार लावला, असे मराठवाडयातील एक लेखक बोराडे आहेत.''[२२] कुरुंदकरांच्या ह्या मतातूनही बोराडे ह्यांचे मराठी कथावाङ्मयातील स्थान किती महत्त्वाचे आहे, ह्याची साक्ष पटते. एकूणच मराठी ग्रामीण साहित्यात रा.रं. बोराडे हे व्यंकटेश माडगूळकर व शंकर पाटील ह्यांच्यानंतरचे तिसरे महत्त्वाचे , मराठी साहित्याच्या कक्षा रूंदावणारे, उजळ करणारे लेखक होत, ह्यात शंका नाही.

----------: ❋❋❋❋❋ :----------

# संदर्भ व टीपा:

*(जेथे आवृत्तीचा उल्लेख नाही, तेथे प्रथमावृत्ती समजावी.)*


| | | |
|---|---|---|
| १. | पहा: नलगे चंद्रकुमार, | ''संपादकीय'','घरशिवार', नलगे चंद्रकुमार (संपा.), साकेत प्रकाशन,औरंगाबाद,१९९९, पृष्ठांक नाही. |
| २. | कुरुंदकर नरहर, | 'दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका',कोल्हापूर, जानेवारी ते जून १९९७, पृ. १९ |
| ३. | कुरुंदकर नरहर, | ''प्रस्तावना'','वानवळा' (बोराडयांची निवडक कथा), कुरुंदकर नरहर (संपा.), अमेय प्रकाशन, नागपूर, १९७९, पृ. ८ |
| ४. | बोराडे रा. रं., | ''माझे कथालेखन: काही विचार'','नातीगोती', लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९७५ पृ .... |
| ५. | तत्रैव, | ''माझी वाङ्मयीन वाटचाल'', 'घरशिवार', नलगे चंद्रकुमार (संपा.), साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९९, पृ. २५८ |
| ६. | यादव आनंद, | ''ग्रामीण कथेचा रूपविचार'','ग्रामीण साहित्य: स्वरूप आणि समस्या'. मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, तृतीयावृत्ती: १९९३, पृ. २३ |
| ७. | कुरुंदकर नरहर, | ''प्रस्तावना'','वानवळा', उनि., पृ. ९ |
| ८. | नलगे चंद्रकुमार, | ''संपादकीय'', 'घरशिवार' (संपा.), उनि, पृष्ठांक नाही. |
| ९. | पवार गो. मा., | ''ग्रार्माण संवेदनशीलता'','सकाळ', पुणे, रविवार पुरवणी, १ ऑगस्ट १९८१, पृ. १ |
| १०. | बोराडे रा. रं., | ''मी आणि माझे साहित्य'','महाराष्ट्र साहित्य पत्रिका', पुणे, (ग्रामीण साहित्य विशेषांक), जुलै - डिसेंबर १९८०, अंक २१४ -२१५, पृ. १०९ |
| ११. | तत्रैव, | 'सकाळ', पुणे, रविवार पुरवणी, २३ जुलै १९९३, पृ. २ |
| १२. | पहा: तत्रैव, | ''बलामत'','पेरणी', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६२, पृ. १९-३० |

| | | |
|---|---|---|
| १३. | तत्रैव, | "तोल", 'कणसं आणि कडबा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९४ , पृ. ४६ - ४९ |
| १४. | पहा: तत्रैव, | "मुराळी", तत्रैव, पृ. २२-२७ |
| १५. | पहा: तत्रैव, | " कणसं आणि कडबा", तत्रैव, पृ. ९९-१०७ |
| १६. | तत्रैव, | " हुरडा",'पेरणी', उनि., पृ. ६५ |
| १७. | पहा: तत्रैव, | 'पेरणी', तत्रैव, पृ. १४४ - १५२ |
| १८. | तत्रैव, | " अभ्यास",'पेरणी', तत्रैव, पृ. ९९ - १०० |
| १९. | पहा: तत्रैव, | " सत्यानाश",'पेरणी', तत्रैव, पृ. ८५ - ९१ |
| २०. | पहा: तत्रैव, | " वेस",'कणसं आणि कडबा', उनि., पृ. ८३ - ९२ |
| २१. | कुरुंदकर नरहर, | " प्रस्तावना",'वानवळा', उनि., पृ. १४ |
| २२. | तत्रैव, | पृ. ९ |

----------: ❋❋❋❋❋ :----------